ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year -VIII, Issue - XIX, Vol.- I

Impact Factor 5.85 (GRIFI)

Jan. 2019 To June 2019

JANVIKAS MAHAVIDYALAYA, BANSAROLA AND
DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHAWADA UNIVERSITY, AURANGABAD

Sponsored

NATIONAL LEVEL CONFERENCE

ON

## "POLITICS OF DEVELOPMENT IN INDIA"




**Editor in Chief**
**Dr. Babasaheb M. Gore**

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 3.42
ISSN 0976-0377
Issue : XV, Vol. II, Jan. 2017 To June 2017

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | **Key Note Address**<br>Dr. B. R. Ambedkar Perspectives on Education and Empowerment in India<br>**Dr. Mahadev Gavhane** | 1 |
| 2 | Economic Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar<br>**K. S. Kamble, Dr N. H. Bhise** | 6 |
| 3 | Non-governmental organizations and Development<br>**Dr. Ajay B. Patil** | 11 |
| 4 | Dr. B. R. Amedkars's perspectives on rural development in India<br>**Milind R. Ghate** | 15 |
| 5 | Environmental Sustainability : Research growth and Trends<br>**Balaji B. Waghmare, Raju B. Zore** | 21 |
| 6 | Politics for Economic Development in India<br>**Shaikh Gafoor Ahmed** | 28 |
| 7 | Politics for Rural Development in India<br>**Dr. Vandana M. Mahure** | 34 |
| 8 | Policies of Government for development<br>**Dr. Faruqui M. Quayyum** | 38 |
| 9 | NGOs and the Indian Development though five year plans<br>**Dr. T. N. Magar** | 44 |
| 10 | Dr. Ambedkar's Perception on Development<br>**Dr. Dattatraya V. Kharatmol** | 48 |
| 11 | भारतीय विकास में संचार माध्यमों की भूमिका<br>**डॉ. मुरलीधर अच्युतराव लहाडे** | 52 |
| 12 | चिरकालीन विकास आणि समस्या<br>**डॉ. गोपाळ शंकरराव भोसले** | 57 |
| 13 | वैश्वीकरण में राज्यके बदलते परिवेश<br>**डॉ. अमोल काळे** | 60 |
| 14 | जागतिकीकरणाचा परिणाम<br>**डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे** | 64 |
| 15 | भारतातील आर्थिक विकास व प्रक्रियेतील घटक<br>**मिनाक्षी मधुकर उबाळे** | 67 |

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर :सुरक्षात्मक दृष्टीकोन व विकास<br>**डॉ. किरण चक्रे** | 72 |
| 17 | जागतिक तापमान वाढीचे परिणाम व उपाय योजना<br>**डॉ. हरिदास जी. पिसाळ** | 76 |
| 18 | जागतिकीकरणाचा राज्यावर झालेला परिणाम<br>**डॉ. एस.आर. कदम** | 81 |
| 19 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम<br>**डॉ. संगीता दत्ताजी मोरे** | 85 |
| 20 | शाश्वत विकास<br>**साईनाथ इस्तारी वाघमारे** | 89 |
| 21 | जागतिकीकरणाचा शेती व शेतकऱ्यावर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>**डॉ. विलास आघाव** | 93 |
| 22 | जागतिकीकरण आणि भारतीय शेती विकासातील अडथळे<br>**डॉ. उमाकांत ज्ञानोबा वानखेडे** | 97 |
| 23 | हिंद-स्वराज आणि शाश्वत विकास<br>**डॉ. शैलजा वरुरे** | 101 |
| 24 | भारतातील ग्रामीण विकास आणि राजकिय दृष्टिकोणाचा राजकिय अभ्यास<br>**डॉ. तुकाराम दत्तात्रय गोंदकर** | 105 |
| 25 | राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून "अन्न सुरक्षा"<br>**महेशकुमार भगवानराव चौरे** | 109 |
| 26 | भारतीय लोकशाही आणि विकास<br>**डॉ. राम प्र. ताटे, डॉ. रमेश के. माने** | 113 |
| 27 | महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण : एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>**डॉ. अनिल दत्तू देशमुख** | 116 |
| 28 | भारतीय राजकीय पक्ष व त्यांची ध्येय धोरणे<br>**विजयसिंग भावरदोडे** | 123 |
| 29 | जागतिकीकरण - भारतीय संदर्भ<br>**डॉ.माधव चोले** | 128 |
| 30 | महिला राजकारण : मराठवाडयाच्या ग्रामिण विकासातील सहभागाचा राजकिय अभ्यास<br>**डॉ. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर** | 134 |
| 31 | चिरकालीन विकासाचा अर्थ, आवश्यकता आणि घटक<br>**डॉ.नामानंद गौतम साठे** | 138 |

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 32 | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ : एक अवलोकन<br>**धर्मराज केशवराव कटके** | 141 |
| 33 | शाश्वत किंवा चिरंतन विकास<br>**डॉ. केशव दत्तराव तिडके** | 147 |
| 34 | जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम<br>**डॉ.गितांजली सदाशिवराव मोटे** | 150 |
| 35 | अन्न सुरक्षा धोरण व आव्हाणे<br>**जयंत हंसराज मोरे** | 154 |
| 36 | सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनाचे महामेरु - डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. सुधाकर एस. हांगे** | 158 |
| 37 | अन्न सुरक्षा<br>**डॉ. मुक्ता सोमवंशी (गंगणे)** | 161 |
| 38 | जागतिकीकरणाचा आर्थिक विकासावर झालेला परिणाम<br>**शितल शामसुदर शिंदे** | 166 |
| 39 | जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>**डॉ. सुखनंदन ढोले** | 170 |
| 40 | महाराष्ट्रातील उद्योजकता विकासातील राजकिय धोरण<br>**बाबुराव रामभाऊ मुंडे** | 175 |
| 41 | भारतातील राज्यशास्त्राचा विकास<br>**अशोक ज्ञानोबा दुनघव** | 178 |
| 42 | मानवाधिकार आणि भारतीय संविधान<br>**डॉ. सुहास मोराळे, महेश कांबळे** | 180 |
| 43 | जागतिकीकरण आणि भारतावरील परिणाम<br>**डॉ. दयानंद माधवराव गुडेवार** | 184 |
| 44 | जागतिकीकरण आणि मराठी नाटक<br>**डॉ. संपदा कुलकर्णी** | 187 |

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE DEGLOOR
Dist.Nanded

# जागतिकीकरण - भारतीय संदर्भ

**डॉ.माधव चोले**
राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड



जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, या प्रक्रियांच्या उदयांचे मुळ हे नवउदारमतवादी विचारप्रणालीत आहे. ही विचार प्रणली व्यक्तींचे आर्थिक स्वातंत्र्य अर्निबंध असले पाहिजे. त्यामुळे व्यक्तींच्या सृजनशिलतेचा विकास होतो. तसेच या आर्थिक स्वातंत्र्यातूनच व्यक्तीला राजकिय स्वातंत्र्य प्राप्त होते. असे या विचारप्रणाली उद्‌गाते म्हणतात. या विचारप्रणलीत - I) व्यक्तींचे अर्निबंध आर्थिक स्वातंत्र्य II) मुक्त बाजार व्यवस्था III) आर्थिक क्षेत्रात राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपास विरोध. IV) शासकिय उद्योगांचे खाजगीकरण इत्यादी तत्त्वे महत्त्वाची आहेत.

जागतिकीकरण या प्रक्रियेचा नवउदारमतवादी या विचारप्रणालीतून उदय झाला असला तरी रशियाचे विघटन व शीत युध्दांची समाप्ती, त्याचप्रमाणे समाजवादांचे वरचेवर कमी होत चाललेले महत्त्व आणि भांडवली अधुनिकतेची वाढत चाललेली नवीन अविस्कृती यामुळे ही प्रक्रिया वाढीस लागली आहे.

जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये अस्तित्त्वात असलेली व्यापारी, भांडवली स्थलांतर, तंत्र हस्तांतरण यावरील प्रतिबंध कमी करण्याची एक प्रक्रिया आहे.

भारताचा परदेशांशी चालेल्या व्यापारात सतत तुट येत होती. ती भरुन काढण्यासाठी शासनाने १९९१ च्या जुलै महिन्यात रिझर्व बँकेकडील ६.७ टन सोने परदेशी बाजारात विकूण परकिय चलन मिळवले पण त्याने तुट भरुन आली नाही. तेंव्हा आपल्याला नाणेनिधीला शरण जावे लागले. नाणेनिधीने भारताला ३ लक्ष ३६ कोटी डॉलर्सचे कर्ज दिले. त्यासाठी डॉलरच्या तुलनेत रुपयाचे २० टक्क्यांनी अवमुल्यन करावे लागले आणि नाणे निधींच्या धोरणांना अनुसरुन येथील वित्तिय व औद्योगिक क्षेत्राच्या मुलभूत घडणीत बदल करावा लागला. त्यामधून परकिय भांडवलाला भारताच्या अर्थव्यवस्थेत प्रवेश मिळाला आणि तिचे जागतिकीकरण झाले.

भारतात या जागतिकीकरणच्या प्रक्रियेचे फायदे, परिणाम आणि पर्याय यांचा अभ्यास पुढील प्रमाणे आहे. प्रत्यक्षात मात्र भारताला जागतिकीकरणांच्या प्रक्रियेमुळे फायद्याऐवजी तोटेच

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019 

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

सहन करावे लागले. तरीपण जागतिकीकरणांच्या प्रक्रियेमुळे - I) भारतात उत्पादित वस्तुंमध्ये गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढली. II) बाजारपेठ ग्राहक उपयोगी बनली III) ग्राहकांना बाजारपेठात वस्तु स्वस्त आणि दर्जेदार प्राप्त झाल्या असे हे फायदे जाणवले.

**जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम :-**

**I) स्वकिय उद्योग संस्था नष्ट :**

भारतातील विविध वस्तु उत्पादन करणाऱ्या उद्योग संस्था ह्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकशित देशांच्या उद्योग संस्थांच्या स्पर्धेत भांडवल, तंत्रज्ञान आणि कुशल व प्रशिक्षित मजुराअभावी नष्ट होत आहेत अथवा धोक्यात आल्या आहेत. त्यात साबन, शीतपेये, कापडे, पादत्राणांपासून टेलिफोन, मोटारीपर्यंत भारतातील उद्योग बेघर झाले आहेत. मध्यम आणि लहान उद्योग तर नष्ट झाले आहेत.

**II) कामगार बेकारीत वाढ :**

भारतात मुळात बेरोजगारी असलेल्या देशात जागतिकीकरणांच्या प्रक्रियेत बाजारात आपले अस्तित्त्व टिकवून ठेवण्यासाठी उद्योग संस्था अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने (कॉम्प्युटर सारखी तंत्रे, मशीनस) काम कंत्राटी पध्दतीने करवून घेतल्याने एका बाजुला एकूण रोजगारात घट, दुसऱ्या बाजुला संघटित कायम स्वरुपी रोजगारात घट, नैमित्तीकरणात वाढ हे रोजगारावरील जागतिकीकरणांचे परिणाम झाले आहेत.

**III) कल्याणकारी राज्याची माघार :**

समाजकल्याण, शासकिय उद्योग आणि गरिबी सहाय्य योजना या क्षेत्रातून शासन जागतिकीकरणात निवृत्त होत चालल्याने. दारिद्रय रेषेखालील लोकांवर वाईट परिणाम होत आहेत. त्यांना पुरेसे अन्न मिळत नाही, आरोग्य, शिक्षण, रोजगार ही नाही. खाजगीकरणांच्या प्रावधानाने दिन-दलितांच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकास प्रक्रियेचा कणाच काढून घेण्यात आला आहे.

**IV) छोट्या शेतकऱ्यांवर संकट आले :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम शेतीवरही झाला आहे. विकसीत देशातील शेतकऱ्यांनी बाजाराभिमूख कृषीपिके घेवून तसेच त्यात नवीन बी, बियाणे, खते, तंत्रज्ञान, याचा वापर करुन पिके घेतलयाने, ती कृषी पिके बाजारात स्वस्त उपलब्ध झाली.

**V) पर्यावरणावर आघात - प्रदुषणात भर :**

जागतिकीकरणांच्या प्रक्रियेत विकशित देशातील आरोग्यास घातक, प्रदुषण करणारे उद्योग विकसनशिल देशात स्थलांतरित करण्याची प्रवृत्ती वाढते आहे. उदा. ॲस्बेस्टॉसचे उत्पादन करणाऱ्या उद्योग संस्था, भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्या, उद्योग, उत्पादन खर्च कमी करण्याचा

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Nanded



मार्ग म्हणून टाकाऊ पदार्थाची योग्य विल्हेवाट लावणारी यंत्रणा उभारली जात नाही, त्यामुळे प्रदुषण वाढते.

**VI) सार्वभौम आर्थिक धोरणावर प्रभाव :**

नव्या आर्थिक धोरणामुळे शासन नवी बंदरे, विमानतळ, पर्यटन केंद्रे, महामार्ग, कारखाने उभे करण्यासाठी बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना मोठ-मोठे जंगल पट्टे, शेती, बहाल करित आहे. त्यामुळे आदिवासी व शेतकज्यांची निर्वाहा साधने काढून घेतली जावून त्यांना देशोधडीस लावत आहेत.

**VII) सांस्कृतिक साम्राज्यवाद :**

जागतिकीकरणात टी.व्ही.चॅनेल्सने सांस्कृतिक अध:पतनात खुप योगदान दिले आहे. ७०-८० चैनल्सवर पाश्चिमात्य धर्तीवरील दिवसाचे चोवीस तास हसण, खाण, पिण, गाण, खेळण, प्रणय, फॅशन, सौंदर्य स्पर्धा, अश्लील जाहिराती, इत्यादी कार्यक्रम हे लहान बालकांपासून म्हाताऱ्यांपर्य संर्वांना मनौवैज्ञानिक पातळीवर गुरफटून व त्यांच्यामध्ये उपभोग प्रवृत्ती निर्माण करुन बाजारवादांची दिक्षा देण्याची सोय केलेली असते.

**भारतीय संदर्भात - बहुराष्ट्रीय कंपन्याची भुमिका अथवा वर्तन :**

बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे अशा कंपन्याचे मुख्य कार्यालय एकाच ठिकाणी असते मात्र तिच्या शाखा विभिन्न देशांत असतात - त्या एकाच ठिकाणाहून आर्थिक व्यवहार पाहतात अथवा करतात.

स्वातंत्र्यपुर्व काळात भारतीय अर्थव्यवस्थेवर तसेच तेल, दवा, चहा, जुट, या उद्योगावर, व्यापार, बँकिंग, वीमा, इत्यादी सेवेवर पुर्ण परकिय भांडवलदार आणि बहुराष्ट्रीय कंपन्याचे अधिपत्य होते. स्वातंत्र्यानंतर रशिया तसेच इतर विकशित देशांना भारतात बहुराष्ट्रीय कंपन्या स्थापण करण्याची संधी दिल्याने तसेच त्या देशांबरोबर आर्थिक आणि तांत्रिक करार केल्याने भारतात भांडवल विनियोग वाढले, तंत्रज्ञानाची माहिती मिळाली, परकिय चलनाची बचत व अर्थव्यवस्थेचा संतुलित विकास झाला पण हा विकास कांही काळापर्यंतच झला.

**भुमिका :-**

आपल्या भांडवलांच्या आधारे भारतीय अर्थव्यवस्थेवर वर्चस्व स्थापन करण्यासाठी या कंपन्यांनी तीन प्रकारचे धोरणे वापरली आहेत, ती अशी.

१) कांही परेदशी कंपन्या त्यांच्या उत्पादनाशी स्पर्धा करणाज्या वस्तु तयार करणाज्या स्थानिक कंपन्या त्यांच्या वस्तुवरील पेटंटसंकट सरळ विकत घेतात. आपल्या मालाला मागणी उत्पन्न करतांना स्थानिक मालाशी स्पर्धा करावी लागु नये हा त्यांचा हेतु असतो.

२) दुसज्या कांही कपन्या भारतात नवीन कंपनी काढतांना स्थानिक लोकांना समान भागीदार

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE DEGLOOR
* Dist.Nanded *

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019 

म्हणून बरोबर घेतात, पण पुढे भारतातील राजकिय व आर्थिक परिस्थितीची जाण वाढल्यावर त्यांना स्थानिक भागीदारांची गरज वाटेनाशी होते. तेंव्हा निरनिराळी कारणे काढून ते भागीदारांना कंपनीतून बाहेर पडायला लावतात किंवा त्यांना निस्प्रभ करतात.

**त्यासाठी एक मार्ग म्हणजे :**

बहुराष्ट्रीय कंपन्या भाग भांडवल वाढवितात या नव्या वाढणाऱ्या भांडवलांच्या अर्धा हिस्सा भांडवल पुरविणे स्थानिक भांडवलदारांना अशक्य होते त्यामुळे त्यांना दुय्यम स्थान पत्करावे लागते. उदा. हिंदुस्थान लिव्हर, हे महत्त्वाचे उदाहरण आहे.

III) कांही परकिय भांडवलदार आधी स्थानिक भागीदाराबरोबर जोड कंपनी काढतात बाजारात जम बसलयावर त्याच प्रकारची वस्तु निर्माण करण्यासाठी शंभर टक्के आपले भांडवल असणारी दुय्यम कंपनी काढतात तिच्या स्पर्धेमुळे मुळ कंपनी बंद पडते व धंदा परकियांच्या ताब्यात जातो.

IV) बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या हितसंबंधाला अनुसरुन धोरण ठरविण्यासाठी राजकिय व्यवस्थेत हस्तक्षेप करतात. त्यासाठी अशा कंपन्या अनेक मंत्र्यांना, प्रशासकिय वरिष्ठ अधिकाऱ्यांना भरमसाठ पैसे देवून विकत घेतात व आपल्या मतानुसार धोरण भाग पाडतात.

उदा. लॉकहिड, नार्थरोप, गुडइयर, फैजर इत्यादी कंपन्यांनी रिश्वत अथवा लाच दिल्यांच्या बातम्या आहेत. बोफोर्स तोफा सौदा इत्यादी.

**जागतिकीकरण व कामगार वर्ग : (भारतीय संदर्भ)**

कल्याणकारी राज्याची कल्पना सोडून देवून आंतरराष्ट्रीय स्पर्धेला उत्तेजन देण्याचे धोरण शासनाने स्वीकारल्यामुळे समाजातील तळाच्या थरातील लोकांची परिस्थिती खालावली आहे. नव्या धोरणानुसार शासनाला सार्वजनिक उद्योगातील गुंतवणूक कमी करावी लागली. सार्वजनिक क्षेत्रातील शासनाच्या ताब्यातील कारखाने विकले गेले आणि हातात आलेले भांडवल शासनाच्या अंदाजपत्रकातील तुट भरुन काढण्यासाठी वापरले गेले. मात्र शासनाच्या या धोरणामुळे लाखो कामगार बेकार झाले.

जागतिकीकरणाने जे भांडवल संबंधित देशाला मिळत असते. त्यामुळे बेकारी कमी होईल अशी आशा करण्यास मुळीच जागा नाही गेल्या कांही वर्षात जागतिक अर्थव्यवस्थेमुळे कामगारवर्गावर जे परिणाम झाले. त्याची चर्चा खालील प्रमाणे करता येईल.

कॉम्प्युटरसारखी जी नवी तंत्रे वापरण्यात येऊ लागली त्यांचे कामगार वर्गावर तीन परिणाम झाले.

I) नव्या यंत्राची उत्पादकता अधिक असल्याने ती चालविण्यासाठी माणसे कमी लागतात. १९९४ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार जगामध्ये बेकार म्हणून नोंदवलेल्या कामगारांची संख्या १२ कोटी होती. भारताच्या बाबतीत हेच खरे आहे

ADARSH VIDYA DEGLOOR COLLEGE SOCIETY'S DEGLOOR Dist.Nanded



राष्ट्रीयकृत बँकानी कॉम्प्युटरचा वापर करण्यास सुरुवात केल्याने त्यांच्यातील नवीन नौकरभरती बंद झाली आहे.

II) संघटीत क्षेत्रातील कामगार आता असंघटित क्षेत्रात ढकललेले जात आहेत. कारखानदार कामगारांना कारखान्यात एकत्र आणण्याऐवजी अनेक छोट्या कारखान्यात त्यांना विभागतात किंवा त्यांना घरुन काम करुन आणण्यास सांगतात याचा परिणाम म्हणून अर्धवेळ करारावर अधारित. जरुर तेंव्हाच काम करणारे अशा कामगारांची संख्या वाढत आहे.

कामगार जेंव्हा मोठ्या संख्येने कारखान्यात एकत्र काम करीत तेंव्हा कामाचे तास, मजुरीचा दर, पगारी रजा असे हक्क मिळविण्यासाठी हे आपल्या संघटना बांधित कारखानदारावर दडपण आणण्यासाठी ते जरुर संपाचे हत्यार वापरित. आता एकच काम अनेक ठिकाणी विभागले गेल्याने कामगार संघटना विस्कळीत होवून कामगार वर्गाची ताकत कमी झाली आहे.

III) जागतिकीकरणानंतर अनेक देशात स्त्रीया अधिक प्रमाणात काम करताना दिसतात. १९५१ साली कॅनडातील स्त्रीयापैकी फक्त २८% स्त्रीया घराबाहेर जावून मजुरीवर काम करीत असत १९९१ साली हे प्रमाण ६०% जावून पोहोचले. भारतात देखील ही प्रवृत्ती वाढतांना दिसते. याचे कारण स्त्रीयांना पुरुषापेक्षा कमी पगार दिला तरी चालतो.

**कामगार चळवळीच्या मार्गातील अडचणी :-**

सध्या प्रत्येक व्यवसायात आणि उद्योगात कामगार चळवळ उभी राहिली आहे; कामगार संघटना स्थापण झाल्या आहेत तसेच कामगार संघटनेचे कार्य राष्ट्रीय व स्थनिक स्तरावरही आहे. असे असले तरी कामगार संघटना आणि कामगारचळवळी आपली उद्दिष्टे साध्य करण्यास यशस्वी झाल्या नाहीत याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**I) पक्षनिहाय कामगार संघटनाची स्थापणा :-**

प्रत्येक कामगार संघटना कोणत्या ना कोणत्या तरी राजकिय पक्षाच्या प्रभावाखाली, नियंत्रणाखाली कार्य करते आहे. उदा. स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेस पक्ष केंद्रात सत्तेवर येताच "भारतीय राष्ट्रीय कामगार संघ सभा" (INTUC) स्थापणा करण्यात आली कॉंग्रेस पक्षाने जाणीव पुर्वक या संघटनेचा विस्तार ज्या राज्यामधून कॉंग्रेस पक्ष सत्तेर आहे अशा राज्याच्या कामगार संघटनामध्ये केला.

**II) शासनाचा हस्तक्षेप :**

कामगार संघटना आणि शासन यांचा संबंध येणे अपरिहार्य असते कारण देशातील सरकारचा कामगाराविषयक कायदे करण्याचा व संघटनेवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार शासनाला असतो. तसेच कामगार संघटनामध्ये वाद उत्पन्न झाला असता तो शासनाच्या मध्यस्तीने सोडविला जातो. अशावेळी शासन निपक्षपातीपणे समतेच्या आधारावर निर्णय देण्याऐवजी, जी संघटना

RNI. MAHMUL02805/2010/33461
*Interlink Research Analysis*
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019


शासनाशी संबंधीत असते. त्या संघटनेच्या बाजुने न्याय दिला जातो.

**III) धर्म व जातीचा प्रभाव :-**

कारखान्यात अनेक जाती धर्माचे लोक काम करीत असतात. ते कामगार वर्ग म्हणून जरी एक असले तरी जात व धर्माच्या विभिन्नतेमुळे त्यांच्यात एकात्मता निर्माण होऊ शकत नाही. कांही संधीसाधु कामगार नेते किंवा राजकारणी कामगारामध्ये जाती, धर्माच्या आधारे फुट पाडून राजकिय स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करीत असतात. परिणामता, कामगार हित बाजुला राहाते.

**IV) कामगार संघटनेमधील स्पर्धा व संघर्ष :-**

निरनिराळ्या उद्योग व्यवसायाच्या निरनिराळ्या संघटना आहेत. इतकेच नव्हे तर एखाद्या उद्योग व्यवसायात अनेक लहान मोठ्या कामगार संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत. आणि त्यांच्यात आपला प्रभाव वाढविण्यासाठी आणि वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सतत स्पर्धा व संघर्ष चालू असतो. त्यात कामगार संघटनांची बरीचशी शक्ती, पैसा व वेळ खर्ची पडत असतो आणि संघटनेच्या मुळ उद्दिष्टाचे दुर्लक्ष होत असते.

**V) स्वार्थी आणि अकार्यक्षम नेतृत्व :-**

गेल्या कांही वर्षापासून कामगार संघटना स्वार्थी नेत्याच्या ताब्यात गेल्या आहेत. अनेक कामगार संघटनाचे नेते स्वतःच्या स्वार्थासाठी कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष करुन उद्योगपतीशी हातमिळवणी करीत असतात. असे कामगाराने कामगार संघटनेच्या दैनंदिन कामगाजाकडे दुर्लक्ष करतात किंवा ते अकार्यक्षम असतात.

## संदर्भ सूची :-

१. 'नवा साम्राज्यवाद', नलीनी पंडीत, जागतिकीकरणात कामगारांची स्थिती, पे.क्र.२१ ते २२.
२. लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स मधील अग्रलेखांच्या टिपणांचा संदर्भ, घेण्यात आला आहे.
३. वारंवार होणाऱ्या प्राध्यापक कक्षातील चर्चेचे मुद्देही घेतलेले आहेत.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded